**सुप्रिय विद्यार्थी मित्रांनो,**

आपणास सांगण्यास अतिशय आनंद होत आहे की, ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक सत्र 2022-23 मध्ये या विद्यापीठात प्रवेश घेतला होता. मात्र शिष्यवृत्ती अर्ज सादर केला नव्हता असे विद्यार्थीही शिष्यवृत्ती अर्ज करून प्रवेशावेळी जमा केलेले शुल्क परत मिळवू शकता.

महाडिबीटी संकेतस्थळावरील शैक्षणिक सत्र 2022-23 चे ऑनलाइन शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्याची मुदत 17 ऑगष्ट 2023 पर्यंत वाढविलेली आहे.

ज्या SC, ST, VJNT, SBC, OBC, EWS प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी संपूर्ण शुल्क जमा करून प्रवेश घेतला आहे, त्या विद्यार्थ्यांना शुल्क परत मिळविण्याची ही संधी आहे.

विद्यार्थ्यांनी कृपया विद्यापीठ संकेतस्थळावरील शिष्यवृत्ती टॅबच्या https://ycmou.digitaluniversity.ac/Content.aspx?ID=1269 या लिंकवर क्लिक करून शिष्यवृत्तीसंदर्भातील माहिती वाचावी. **(हे अनिवार्य आहे)**

संपूर्ण माहिती वाचल्यानंतर महाडिबीटी संकेतस्थळाच्या https://mahadbt.maharashtra.gov.in/ या लिंकवर क्लिक करून आवश्यक असलेले Documents अपलोड करून शिष्यवृत्ती अर्ज सादर करायचा आहे. **(हे अनिवार्य आहे)**

शिष्यवृत्ती कक्षाच्या Telegram वरील YCMOU Scholarship या Group ला https://web.telegram.org/a/#-1598583684 या लिंकवर क्लिक करून Join करावयाचे आहे. **(हे अनिवार्य आहे)**

शिष्यवृत्ती अर्ज सादर करताना अडचणी येत असल्यास विद्यापीठाच्या शिष्यवृत्ती कक्षाच्या Official youtube Channel वरील Video बघण्यासाठी https://www.youtube.com/@YCMOUScholarship या लिंकवर क्लिक करावे. **(हे अनिवार्य नसून ऐच्छिक आहे)**

ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक सत्र 2023-24 संपूर्ण शुल्क जमा करून प्रवेश घेतला आहे. अशा विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्तीचा अर्ज सादर करता येणार आहे. अशा विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती शासनाकडून मंजूर झाल्यानंतर विद्यार्थ्यांने प्रवेश घेतेवेळी जमा केलेले शुल्क विद्यार्थ्यांना परत मिळू शकते.

शैक्षणिक सत्र 2023-24 ची महाडिबीटी संकेतस्थळावरील ऑनलाइन शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्याची प्रक्रिया अद्याप सुरू झालेली नाही, ती सुरू होताच आपणास Telegram वरील YCMOU Scholarship व Youtube वरील शिष्यवृत्ती कक्षाच्या YCMOU Scholarship या चॅनेलवरून कळविण्यात येईल. तेव्हा शिष्यवृत्ती पर्याय स्वीकारून प्रवेश घेतलेले विद्यार्थी व संपूर्ण शुल्क जमा करून प्रवेश घेतलेले विद्यार्थी ऑनलाइन शिष्यवृत्ती अर्ज सादर करू शकतील.

**आपणास शिष्यवृत्तीसाठी शुभेच्छा !**